नि.फौ.खटला क्र. १३३/२०२३
निशाणी ०१ सोबत

साक्षीदार क्र. ०२
साक्षीदाराचे नांव – पांडुरंग तुकाराम माळी
वय – ७९ वर्षे, धंदा – निवृत्त
रा. खरशिंग, ता. कवठे महांकाळ, जि. सांगली.

शपथेवर कथन करतो की,

**फौजदारी प्रक्रिया संहिता २०० प्रमाणे साक्षीदार क्र.०२ ची पडताळणी.**

मी खरशिंग येथील आजीमाजी सैनिक पतसंस्थेत सन २००१ ते २००५ याकालावधीत सचिव म्हणून काम करीत होतो. सन २००३ मध्ये वरील पतसंस्थे मार्फत २० प्रकरणामध्ये सुक्ष्म कर्ज मंजुर केले होते. सदरील २० प्रकरणामध्ये कर्जदारांकडून अर्ज आले होते. सदरील प्रकरणामध्ये कर्ज मंजुरी ही संचालक मंडळाच्या सभेत देण्यात आली होती. त्या सभेत मी उपस्थित होतो. कर्ज मंजुरीच्या एका प्रकरणाकरीता २२०० रुपये कर्ज मंजुर करण्यात आले होते व कर्जदारांकडून प्रत्येकी ११० रु. शेअर्सपोटी अनामत घेण्यात आले होते. सदरील कर्जाची रक्कम कर्जदारांना धनादेशाद्वारे देण्यात आली होती. सदरील कर्ज हे कर्जदारांना घरगुती गॅस व सिलेंडर खरेदी करीता मंजूर करण्यात आले होते. कर्जदारांना देण्यात आलेल्या धनादेशांवर संचालक कम क्लार्क कम खजिनदार सुरेश अंकुश लोंढे यांनी निर्गमित केले होते. सदरील धनादेशांवर ठरावानुसार अध्यक्ष व सचिव किंवा उपाध्यक्ष व सचिव यांच्या सहया होत्या. वर नमुद कर्जाची परतफेड कर्जदारांनी केली आहे. वर नमुद प्रकरणामध्ये अफरातफर केल्याच्या कारणांवरुन पतसंस्थेने माझ्या विरुध्द फौजदारी प्रकरण दाखल केले होते. सदरील प्रकरण खोटे दाखल केले होते. प्रस्तुत प्रकरणामध्ये मे. न्यायालयाने दोषमुक्त केले आहे. वर नमुद प्रकरणामध्ये माझ्या व्यतीरिक्त फिर्यादी यास ही आरोपी करण्यात आले होते. वर नमुद फौजदार प्रकरण २००६ पासून ते सन २०२४ पर्यत चालले. सदरील प्रकरणाच्या प्रत्येक तारखेस मी व फिर्यादी एस टी बसने जात होतो. पतसंस्थेच्या संचालक मंडळातील सर्व लोकांनी आमचे

13.08.2024

विरुध्द फौजदारी प्रकरण दाखल केले होते.

श्रवणोत्तर निवदेन स्वीकृत.

साक्षीदाराची सही.

( पांडुरंग तुकाराम माळी )

माझ्या समक्ष

श्रवणोत्तर स्वीकृत,

13.08.2024

(पी. जे. लिगाडे)

सह न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,कवठेमहांकाळ

कवठे महांकाळ

दिनांक -१३/०८/२०२४